# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका

अंक ५ वा (एप्रिल, मे, जून २०२४)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक ४२०२१३ |संपर्क : ९८६०५५२३२४/९६९९०९१२३३

Email : gharkulparivar@gmail.com I Web : www.gharkulparivar.org


## संपादकीय

### सप्रेम नमस्कार ..

आनंदयात्रा या त्रैमासिक पत्रिकेचा हा पाचवा अंक या अंकात एप्रिल मे व जून 2024 या तीन महिन्यांचा घरकुल मधील वृत्तांत समाविष्ट केलेला आहे.

या कालावधीत प्रामुख्याने उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्यामुळे विद्यार्थिनी घरी गेलेल्या असतात त्यामुळे इतर दिवसांच्या तुलनेत जरा चहल पहल कमी असते. मात्र उन्हाळ्याचा काळ असल्याने घरकुल मध्ये उन्हाळी वाळवणाचे प्रोडक्ट्स जसे नागली पापड, कुरडया, साबुदाणा-बटाटा पापड करण्यामध्ये मुली आणि मावश्या रमल्या होत्या.

दिल के करीब ने घरकुलला सातासमुद्रापार ओळख मिळवून दिली. त्यामुळे घरकुल अधिक व्यापक झाले . जूनमध्ये अमेरिका येथे पार पडलेल्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनात घरकुलच्या कापडी पिशव्या रवाना झाल्या आणि ह्या संमेलनात घरकुल वरील “आ चल के तुझे" ही व्हिडिओ क्लिप देखील दाखवण्यात आली. यानिमित्ताने घरकुल इंटरनॅशनल व्यासपीठावर पोहोचले याचा खूप आनंद आणि अभिमान आहे.

आपण सर्वजण नेहमीप्रमाणेच या ‘आनंदयात्रा’ पत्रिकेला भरभरून प्रतिसाद देत आहात याचा आनंद आहे. आपणा सर्वांना नम्र विनंती आपल्या सूचना प्रतिक्रिया नक्की आमच्यापर्यंत पोहोचवाव्या आणि घरकुलला जरूर भेट द्यावी

***

-: संपादकीय मंडळ :-

सौ. सुनिता आडके — सौ. साधना देशमुख

सौ. विद्या फडके — सौ. वल्लरी प्रधान

श्री. नरेश महाजन — सौ. सोनल खाडिलकर

***







# मुक्काम.. पिंपळगाव बहुला

उपनगर मधील आऊमाऊ बंगला , नंतर पाथर्डी फाट्यावरील दोन वर्षांचा मुक्काम आणि त्यानंतर पिंपळगाव बहुलाचा प्रवास या सर्व घटना, पुढे जाण्याची प्रेरणा देणाऱ्या ठरल्या . सतत काहीतरी चांगलं घडत जातंच हा विश्वास या प्रवासात निर्माण झाला.


मुलींची वाढती संख्या, संस्थेचा वाढता व्याप आणि मुलींना द्यावयाच्या सर्व सुखसोयी यासाठी मोठी वास्तू आवश्यक होती.

घरकुल परिवाराचे पहिल्यापासूनचे स्नेही प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व उद्योजक श्री. राजेंद्र गोठी यांनी पिंपळगाव बहुला येथे एक मोठी इमारत बांधलेली होती. ती अतिशय सुयोग्य आणि आम्हाला सर्वांना हवी तशी होती .मोकळी हवेशीर मोठी जागा ,मोठ्या खोल्या असे सगळे मिळाल्यामुळे खूप आनंद झाला. आणि त्या ठिकाणी घरकुलचे वास्तव्य करण्याचे ठरले.

गोठींच्या आधार एवढा मोठा की
" तुम्ही आता या ठिकाणी कायमच्या रहा "असे ते सांगत असत. हा दिलासा फार मोठा होता. पुढे घरकुलची या ठिकाणची जागा,स्वच्छता ,इतर व्यवस्था सर्व छान असल्यामुळे प्रतीक्षा यादीवरील मुलींच्या पालकांनी सतत आग्रह करून मुलींना प्रवेश द्यावा अशी विनंती केली. मुली आणखीन वाढवायच्या आणि आणखीन त्यांच्या सुखसोयी,शिवाय निरनिराळ्या वस्तुंचे उत्पादन करायचे तर मग आपली स्वतःचीच एक छान ,मोठी वास्तू उभारावी असे कार्यकारणीच्या मनात आले. त्याप्रमाणे मग जागेचा शोध सुरू झाला .पण म्हणतात ना , "काखेत कळसा आणि गावाला वळसा "त्याप्रमाणे घडले. या वास्तूच्या समोरच श्री. गोठींचे आणखी दोन प्लॉट होते. तेच विकत घेण्या विषयी कार्यकारणीत चर्चा झाली. श्री. गोठींनी अतिशय रास्त भावात हे दोन्ही प्लॉट घरकुलच्या स्वाधीन केले.

गोठींनी बांधून दिलेल्या इमारती व्यतिरिक्त आणखीन एक मोठी स्वतःची अशी वास्तू घरकुलला मिळणार होती. प्रसिद्ध वास्तु विशारद श्री संजय पाटील व त्यांची कन्या अनघा पाटील यांच्याकडे वास्तूचा आराखडा करण्याची जबाबदारी दिली. त्यांनी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. या विशेष मुलींच्या गरजा, त्यांना लागणाऱ्या खोल्यांमधील व्यवस्था, या मुलींना विविध प्रकारचे उत्पादनाचे काम करण्यासाठी प्रशस्त जागा, सभागृह अशा सर्व गोष्टींचा विचार हा आराखडा तयार करताना झाला .संजय पाटील आणि अनघा पाटील यांनी त्यावर खूप विचारपूर्वक मेहनत घेतली .त्यामुळे या मुलींच्या सर्व गरजा त्या ठिकाणी कशा पूर्ण होतील हे पाहिले. आराखडा तयार झाला. हा आराखडा प्रत्यक्षात कसा पूर्णत्वास न्यायचा याबाबत कार्यकारणीत विचार होऊ लागला.नंतर मनातल्या या विचारचे प्रत्यक्ष कृतींत कसे रूपांतर झाले आणि आजची वास्तू कशी उभी राहिली तो वृत्तांत आपण पुढच्या भागात पाहूया.

# घरकुलचे आधारस्तंभ



## मा. नरेंद्र भाई गोलिया व सौ.आशा भाभी गोलिया
### (संस्थापक : Rishabh Instruments Ltd. )

घरकुलसारखी संस्था उभारताना सातत्याने अनेक दानशुरांचे सहकार्य लाभले. दानशूरता ही केवळ पैशाचीच नसते तर प्रेमाचीही असते .प्रेम आणि पैसा दोन्ही एकत्र झाले तर हा अमृत योग म्हटला पाहिजे. असाच अमृत योग सातत्याने देणारे माननीय नरेंद्र भाई गोलिया नाशिक मधील प्रसिद्ध उद्योगजक आणि त्यांच्या पत्नी सौ आशा भाभी गोलिया या दोघांनी घरकुलच्या हातात हात दिला आणि घरकुलच्या वाटचालीत एक मोठा आधार मिळाला. या दोघांच्या मनात घरकुलबद्दल नितांत आदर आहे. श्री. नरेंद्र भाई घरकुल मधील उत्पादनाचे आपल्या कंपनीत स्टॉल लावतात. जास्तीत जास्त विक्री कशी होईल हे बघतात. या संदर्भात मार्गदर्शनही करतात .घरकुल मधील शिक्षकांना योग्य मानधन मिळाले पाहिजे ही त्यांची तळमळ आहे. त्यासाठी ते सातत्याने अर्थसहाय्य करीत असतात. हे दोघेही घरकुलमधे आल्यावर घरकुलची आत्मियतेने चौकशी करतात.

सौ.आशा भाभी घरकुलमधे आल्यावर, त्यांचे मृदू वागणे, लोभस व्यक्तिमत्व आणि आपुलकीचे बोलणे यामुळे प्रत्येक मुलीला खूप आनंद होतो. कोणीतरी आपलं माणूस आलं आहे असं त्यांना वाटतं. त्यांना या मुलींविषयी अतिशय आत्मियत आहे . या दोघांचाही असा भावनिक जिव्हाळा ही घरकुलची मोठी ठेवच म्हटली पाहिजे. या दोघांना द्यावे तितके धन्यवाद कमीच आहेत.

## कृतज्ञतेचा नमस्कार...

एखाद स्वप्न पूर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी सगळ विश्व तुम्हाला साहाय्यभूत होत. अस म्हणतात ते खोठ नाही. घरकुल सुरु झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरूपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ - १८ वर्षाचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आलेय यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठ संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे.

त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ सहकार्य जिव्हाळा हवा आहे. आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार! घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

## विश्वासू सहकारी



# राजे जी स्वामिनी आचार्यदेव

घरकुलची संपन्नता ही जशी या वास्तुत आहे तशीच ती घरकुल ला मिळालेल्या स्टाफ च्या बाबतीतही आहे आतापर्यंतच्या आनंदयात्राच्या अंकात स्टाफ विषयी लिहायला सुरुवात केली आणि प्रत्येकीच्या घरकुल मध्ये झालेल्या प्रवेश प्रसंगींच्या आठवणी जाग्या होऊ लागल्या या अंकात  घरकुलच्या देव मावशी म्हणजे लौकीकार्थाने ज्यांचे नाव राजे जी स्वामिनी आचार्य देव यांच्या घरकुल मधील योगदानाचा आढावा घेत आहोत.

 देव मावशी ह्या उच्च शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या, महाविद्यालयातील अध्यापनाचा अनुभव असलेल्या, मराठी विषय घेऊन एम ए एम फील सेट अशा पदव्यांनी परिपूर्ण आहेत.

 काही वर्षांपूर्वी त्यांचे मन अध्यात्माकडे झुकू लागले त्यात त्या अधिक रमू लागल्या. अध्यात्मा बरोबरच रुग्णसेवेतही त्यांना परमार्थाची अनुभूती येऊ लागली आणि अध्यापनाचे काम सोडून पूर्णवेळ त्या अध्यात्म आणि गावोगावी फिरून रुग्णसेवा करू लागल्या. तब्बल अकरा वर्ष या क्षेत्रातील कार्य केले. एका ठिकाणी स्थिरावण्याचा विचार त्यांचा मनात आला,  योगायोगाने त्यांची आणि विद्या ताईंची गाठ पडली. देव मावशी सांगतात घरकुल मध्ये आले विद्या ताई ना भेटले आणि त्यांच्या कार्याला सलाम केला. देव मावशी 5 जुलै 2021 मध्ये घरकुल मध्ये रुजू झाल्या. आज त्या रेक्टर या नात्याने घरकुलच्या मुलींचा दिवस-रात्र सांभाळ करतात रेक्टरची जबाबदारी ही दुधारी तलवारी सारखी असते शिस्त लावणारी  व्यक्ती बरेचदा अप्रिय असते. देव मावशींनी हे आव्हान स्वीकारून कामाला सुरुवात केली. मुलींच्या वेळापत्रकानुसार सर्व दिनक्रम राबवताना या मुलींच्या विशेष मर्यादा लक्षात घेऊन प्रसंगी कडक तर एरवी गप्पा गोष्टी हास्यविनोद यातून मुलींची कळी खुलवून वातावरण तणावमुक्त करतात. हास्ययोग देव मावशींनी प्रयत्नपूर्वक मुलींमध्ये लोकप्रिय केलेला आहे. तसेच सकाळ संध्याकाळची प्रार्थना मनाचे श्लोक रामरक्षा शुभंकरोती हे फडके मॅडमनी मुलींच्या दृष्टीने घालून दिलेले रुटीन देव मावशी अगदी कसोशीने पाळतात. मुलींचे भोजन, आरोग्य, स्वच्छता करून घेणे यासाठी जातीने लक्ष घालतात. रात्रीचा राऊंड. सर्व महत्वाचे रेकॉर्डस नियमितपणे मेंटेन करणे या बाबतीत त्या अगदी काटेकोर आहेत. त्यामुळे शासनातर्फे समाज कल्याण किंवा इतर कोणत्याही इन्स्पेक्शनची घरकुल ला कधी चिंता नसते. या सगळ्या कामाबरोबरच एक विशेष जबाबदारी त्यांनी पेललेली आहे, ती म्हणजे घरकुलच्या प्रचंड मोठ्या बगीच्या मध्ये तयार होणाऱ्या पालापाचोळ्याचे कंपोस्ट खत तयार करणे . मध्यंतरीच्या काळात फडके मॅडमचं पुण्यातलं वास्तव्य प्रकृती अस्वास्थ्यामुळे वाढलं तेव्हा, देव मावशी असल्यामुळे घरकुलच्या मुली, ताया, मावश्या आणि आम्हा सर्वांना फार मोठा दिलासा होता.

घरकुलची संपन्नता आणि जमेची बाजू ही देव मावशीं सारखे झोकून देऊन आपलेपणाने काम करणारे विश्वासू सहकारी होय.

# गोष्ट एकेकीची

## वैशाली सुधाकर भगत

वैशाली घरकुलच्या जुन्या म्हणजे सुरूवातीपासूनच्या विद्यार्थिनींपैकी एक! कौटुंबिक परिस्थिती अगदी साधारण. घरकुल आऊ-माऊ बंगल्यात सुरू झालं तेव्हा तिच्या आईने तिलाही घरकुल मध्ये ठेवून घ्यावं अशी विनंती केली. आणि वैशालीचा घरकुल मध्ये प्रवेश झाला.

आज वैशाली घरकुलच्या किचन मधील एक महत्त्वाची मदतनीस आहे. वैशालीला सुरूवातीपासूनच स्वयंपाक घरातील काम टाप टीप, स्वच्छता, याची आवड होती. घरकुल मधील कार्यपद्धतीप्रमाणे मुलींचे सुप्त गुण हेरून त्यानुसार त्यांच्यातल्या कलागुणांना वाव दिला जातो. वैशालीला मुळात स्वयंपाकाच्या कामात आवड होती हे लक्षात घेऊन फडके मॅडमनी तिला स्वयंपाक घरातली छोटी छोटी काम शिकवावी असे ठरविले. त्यानुसार स्वयंपाक करणाऱ्या मावश्यांना सूचना दिल्या . या कामांमध्ये ती लवकर तयार झाली. भाजी चिरणे, कणिक मळणे, पोळ्या लाटणे ,कोशिंबीर करणे अशी छोटी छोटी किचन मधील काम जयश्रीताई आणि लताताई यांच्या देखरेखीखाली वैशालीने शिकून घेतली .

क्वचित चहा करणे, लिंबू सरबत करणे अशी काम सुद्धा वैशाली आवडीने करते. हळूहळू तिच्यात बराच बदल झालाय. फूड प्रॉडक्शनच्या कामातही ती मदतीसाठी कायम पुढे असते .पुऱ्या लाटणे, पापड करणे असे काम स्वतःहून करते .

वैशाली स्वतःची स्वच्छता तर करतेच पण रूम मधील इतर मुलींना आवरण्यासाठी ताई मावशींना मदत करते झाडलोट करणे कपडे वाळत घालणे कपड्यांच्या घड्या घालणे अशी एक ना अनेक कामे वैशाली सहज उरकते. हा तिच्यातला बदल अगदी सुखावणारा आहे. संध्याकाळी ग्रीन जिम वर न चुकता व्यायाम करतानाही ती तेवढ्याच उत्साहाने आढळते. आता तर वैशाली मध्ये इतकी प्रगती झालेली आहे की लेझीम, योगा डान्स, समूहनृत्य यातही ती सहभागी होते. ताया मावश्यांना फुलं लावण्यामध्ये, डेकोरेशन मध्ये मदत करते. घरकुल हे तिचं पहिलं घर झालं आहे. सुट्ट्यांमध्ये इतर मुली घरी जातात पण काही जणी ज्यांचे घरकुलच घर आहे त्या इथेच असतात. वैशाली या सगळ्या मुलींसोबत उन्हाळ्याच्या सुट्टीत, दिवाळीच्या सुट्टीत घरकुल मध्येच राहते. तिच्या आईला वाटतं तिनेही घरी राहावं मग सगळ्या मुली आल्यानंतर ती थोडे दिवसासाठी आईच्या समाधानासाठी घरी जाते. गंमत म्हणजे तिला स्वयंपाक घरातले एखादे काम करू दिलं नाही किंवा एखाद्या दुसऱ्याच मैत्रिणीने केलं तर तिला खूप रूसवा येतो. तिचा रूसवा काढता काढता ताया मावश्यांची दमछाक होते.

वैशालीला फार छान उंचीची देणगी लाभली आहे, म्हणून तिला सर्व जण गमतीने घरकुलचा अमिताभ बच्चन म्हणतात.

*** आवाहन ***
**-: ऑनलाईन देणगीसाठी :-**

देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट

| | |
|---|---|
| A/C Name : | Gharkul Parivar Sanstha |
| Bank Name : | Bank of India |
| Branch : | Shivaji Udyan, Nashik |
| A/C No. : | 080610110000256 |
| IFSC : | BKID0000806 |

# भेटीगाठी व कार्यक्रम

## एप्रिल 2024

- समाज कल्याण कार्यालयातर्फे इन्स्पेक्शन साठी वैशाली ढाके मॅडम यांनी भेट दिली व संस्थेतील सर्व सोयी सुविधा कार्यशाळा मुलींच्या रूम्स ,किचन ,प्रोडक्ट यांची पाहणी केली संस्थेच्या नोंदी व रजिस्टर तपासले काही सूचना केल्या व संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.
- भुजबळ कॉलेज ऑफ इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी संस्थेला भेट दिली .
- करूणा भिडे व योगिता सूर्यवंशी या घरकुलच्या स्टाफ मेंबर्सनी धर्मादाय सहआयुक्त नाशिक व ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय विश्वस्त कार्यशाळेत सहभागी झाल्या.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला व ढेवमावशींनी डॉआंबेडकरांविषयी माहिती सांगितली .



समाज कल्याण अधिकारी श्रीमती वैशाली ढाके यांची घरकुल ला भेट

पार्कर लॉर्ड कंपनीचे श्री अमित गौर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी घरकुल ला भेट दिली.





लोकमान्य मल्टीपर्पजच्या श्री हेमंत फडके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संस्थेस भेट दिली

# एप्रिल 2024

## एक नवा उपक्रम

मुलींनी वेगवेगळी कौशल्य शिकवींत आणि सुट्टीसाठी सुट्टींत मुलींना घरी नेण्यासाठी पालक येतील तेव्हा त्यांना आपल्या मुलींचे कौतुक दाखवता यावे यासाठी यावर्षी फडके मॅडम यांच्या मार्गदर्शनातून एक प्रकल्प हाती घेतला. एकूण पंधरा शिक्षिकांना प्रत्येकी तीन ते चार विद्यार्थिनी वाटून देण्यात आल्यात आणि त्या शिक्षिकानी मुलींना काही नवीन वेगळ्या गोष्टी शिकवायच्या आणि त्यांची व्हिडिओ Clip तयार करायची .हा प्रकल्प खूप उत्साहवर्धक व प्रेरणादायी ठरला.




BNI ग्रुपच्या श्री राजेंद्र कामत,श्री अनंत निकम, श्री सचिन खराटे, श्री महेश देशमुख श्री चिंतन मेहता ,सौ प्रतिभा कुलकर्णी यांनी घरकुल ला भेट दिली.

BNI मध्ये ममता माशाळकर यांनी घरकुल विषयीच्या माहितीचे प्रेझेंटेशन दिले





चित्पावन महिला मंडळ नाशिक रोड यांच्या तर्फे चैत्र गौरीचे हळदी कुंकू घरकुल येथे आयोजित केले

## मे 2024

- मे महिन्यात नागली पापड साबुदाणा बटाटा पापड कुरडया यांची समाधानकारक विक्री झाली






१ मे रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.NIPM चे श्री गिरीश लाड, श्री प्रकाश बारी तसेच श्री आचारी (BNI सदस्य) व त्यांच्या सहकाऱ्यांना या निमित्ताने निमंत्रित केले होते . श्री प्रकाश बारी सरांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत, झेंडा गीत, योगा डान्स व महाराष्ट्र गीत सादर केले.



मे महिन्यात पालक सभेचे आयोजन करण्यात आले



मुंबई येथील मुकेश पटेल स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट व इंजीनियरिंगच्या दोन विद्यार्थिनींनी २० दिवस (६ मे ते २६ मे २०२४) इंटर्नशिप साठी आल्या होत्या.

## जून 2024



5 June जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने माहिती देताना घरकुल मधील शिक्षिका



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घरकुल मधील बागेच्या भिंतीची सजावट करण्यात आली



सौ. नीता जांबोटकर, सौ. नीता चंद्रात्रे, सौ सौ कांचन सौंदाणकर यांनी घरकुल ला भेट दिली




उद्योजक श्री अजय यादव यांनी त्यांची कन्या 'ऋषीता' . हिचा वाढदिवस त्यांच्या कुटुंबीयांसह व विनोद भाई व आशा भाभी पारेख यांच्या समवेत साजरा केला. याप्रसंगी त्यांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले .

## जून 2024

# आंतरराष्ट्रीय योग दिन





आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने घरकुल मध्ये योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा शिक्षिका आणि विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आल्या




आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धेतील विजयी विद्यार्थिनी, शिक्षिका व परीक्षक आणि प्रमुख पाहुण्यां स्वाती ताई पंडित.